# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

उप-प्रादेशिक कार्यालय, धूळे

ई-मेल:-
srodhule@mpcb.gov.in
फोन नं.०२५६२-२७३७३०

फुलचंद प्लाझा, २ रा मजला,
बिलाडी रोड, विद्यानगरी
देवपूर, धुळे. ४२४००२

---

जा.क्र.मप्रनिमं/उप्राकाधु / ५३३ /१९ दिनांक:- ६ / ०८ /२०१९

**प्रति,**
**मा. जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय,**
**धुळे.**

**विषय :** जैविक वैद्यकीय कचरा (BMW) जिल्हास्तरीय समिती गठित करणेबाबत...

**संदर्भ :** १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक: संकिर्ण २०१७/प्र.क्र. ४४/आरोग्य ३, दिनांक ०९/०१/२०१९
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक: संकिर्ण २०१७/प्र.क्र. ४४/आरोग्य ३, दिनांक १३/०४/२०१९
३) शासन परिपत्रक, क्रमांक: संकिर्ण २०१७/प्र.क्र.४४/आरोग्य ३, दिनांक ०४/०४/२०१९

आदरणीय महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार सादर करण्यात येते की, जैव वैद्यकीय कचरा अधिनियम, २०१६ मधील नियम ११ (१) नुसार राज्यस्तरीय सल्लागार समितीची स्थापना करण्यास संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली होती. जैव-वैद्यकीय कचरा अधिनियम, २०१६ अंतर्गत नियमांची योग्यरित्या अंमलबजावणी केली जाते अथवा नाही यावर देखरेख ठेवणे, सदर अधिनियम अंतर्गत सल्ला देण्याचे तसेच सदर अधिनियमात सुधारणा झाल्यास त्याबाबत सल्ला देण्याचे काम राज्यस्तरीय सल्लागार समितीचे आहे. राज्यस्तरीय सल्लागार समितीप्रमाणेच जिल्हास्तरीय सल्लागार समितीची स्थापना करण्याबाबत या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हास्तरीय सल्लागार समिती स्थापन करणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने धुळे जिल्हयाकरीता उपरोक्त शासन निर्णयानुसार जैव वैद्यकीय कचरा अधिनियम, २०१६ अंतर्गत नियमांची योग्यरित्या अंमलबजावणी बाबत देखरेख ठेवण्याकरीता जिल्हास्तरीय सल्लागार समिती गठीत करण्याबाबतचा मसुदा आपल्या मंजुरी करीता सविनय सादर करण्यात येत आहे.

आपल्या माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

आपली विश्वासू,
Patil 6/8/19

**(सौजन्या सु. पाटील)**
उप- प्रादेशिक अधिकारी
म. प्र. नि. मंडळ, धुळे.

सोबत :- वरील प्रमाणे.

प्रत माहीती स्तव सविनय सादर :-
प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ, नाशिक.

वाचले:- १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक: संकिर्ण २०१७/प्र.क्र.४४/आरोग्य ३, दिनांक ०९/०१/२०१९.
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक: संकिर्ण २०१७/प्र.क्र.४४/आरोग्य ३, दिनांक १३/०४/२०१९.
३) शासन परिपत्रक, क्रमांक: संकिर्ण २०१७/प्र.क्र.४४/आरोग्य ३, दिनांक ०४/०४/२०१९.

क्र.साशा/अेआरके/कावि/२०१९/
जिल्हाधिकारी धुळे यांचे कार्यालय,
धुळे. दि. ६/०८/२०१९

आदेश-

उपोद्घातातील अ. क्र. १ व २ अन्वये तसेच संदर्भ क्र. ३ च्या परिपत्रकान्वये जैव वैद्यकीय कचरा अधिनियम, २०१६ मधील नियम ११ (१) नुसार राज्यस्तरीय सल्लागार समितीची स्थापना करण्यास संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली होती. जैव-वैद्यकीय कचरा अधिनियम, २०१६ अंतर्गत नियमांची योग्यरित्या अंमलबजावणी केली जाते अथवा नाही यावर देखरेख ठेवणे, सदर अधिनियम अंतर्गत सल्ला देण्याचे तसेच सदर अधिनियमात सुधारणा झाल्यास त्याबाबत सल्ला देण्याचे काम राज्यस्तरीय सल्लागार समितीचे आहे. राज्यस्तरीय सल्लागार समितीप्रमाणेच जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय सल्लागार समितीची स्थापना करण्याबाबत या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले आहे. सबब वरील शासन निर्णयातील तरतुदीनुसार धुळे जिल्हयासाठी जैव वैद्यकीय कचरा जिल्हास्तरीय सल्लागार समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | रचना | पदनाम |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी, धुळे | अध्यक्ष |
| २ | जिल्हा शल्यचिकित्सक, धुळे | सदस्य |
| ३ | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे | सदस्य |
| ४ | उप आयुक्त, धुळे महानगरपालिका | सदस्य |
| ५ | मुख्य आरोग्य अधिकारी, धुळे महानगरपालिका | सदस्य |
| ६ | प्रादेशिक अधिकारी, जिल्हा प्रदूषण नियंत्रण मंडळ | सदस्य सचिव |
| ७ | इंडियन मेडिकल असोसिएशन, धुळे (अध्यक्ष) | प्रतिनिधी |

उक्त समिती मधील इंडियन मेडिकल असोसिएशन सदस्यांचा सदस्य पदाचा कालावधी हा आदेशाच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीसाठी राहील.

जिल्हाधिकारी, धुळे

प्रत:
(१) जिल्हा शल्यचिकित्सक, धुळे
(२) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे
(३) उप आयुक्त, धुळे महानगरपालिका
(४) मुख्य आरोग्य अधिकारी, धुळे महानगरपालिका
(५) प्रादेशिक अधिकारी, जिल्हा प्रदूषण नियंत्रण मंडळ
(६) प्रतिनिधी, इंडियन मेडिकल असोसिएशन, धुळे

जिल्हाधिकारी, धुळे